|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि. २५ ( प्रतिनिधी ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधरांमधून निवडून द्यावयाच्या दहा जागांसाठी झालेल्या मतदानाची बुधवार, दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता सुरु झालेली मतमोजणी गुरुवारी दुपारी १२ वाजता संपली. अधिसभेवर विष्णू भंगाळे, अमोल मराठे, दीपक पाटील, अमोल सोनवणे, दिनेश नाईक, दिनेश खरात, नितीन ठाकूर, विवेक लोहार, अमोल पाटील आणि मनिषा चौधरी हे दहा उमेदवार निवडून आले.

रविवार दि.२१ जानेवारी रोजी या दहा जागांसाठी मतदान झाले होते. बुधवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील कर्मचारी भवनात मतमोजणीला प्रारंभ झाला. रात्री बारा वाजेपर्यंत पाच निकाल जाहीर झाले होते. खुल्या संवर्गातील मतमोजणी सकाळपर्यंत चालली. शेवटचा निकाल गुरुवारी दुपारी ११.४५ वाजता जाहीर करण्यात आला. अधिसभेचे निकाल खालीलप्रमाणे-

**अनुसूचित जाती संवर्ग-** झालेले मतदान-१०६०४, वैध मते- ९३९८, अवैध मते- १२०६, विजयासाठी कोटा- ४७००, विजयी उमेदवार दिनेश खरात (५,७८८ मते), पराभूत उमेदवार भगवान कटारे (२९०० मते), शिरीषकुमार तायडे (७१० मते) **अनुसूचित जमाती संवर्ग-** झालेले मतदान-१०६०४, वैध मते- ९६४४, अवैध मते- ९६०, विजयासाठी कोटा- ४८२३, विजयी उमेदवार नितीन ठाकूर (६३४० मते), पराभूत उमेदवार गणेश सोनवणे (३३०४ मते), **विमुक्त जाती संवर्ग-** झालेले मतदान-१०६०४, वैध मते- ९५९३, अवैध मते- १०११, विजयासाठी कोटा- ४७९७, विजयी उमेदवार विवेक लोहार (५८६५ मते), पराभूत उमेदवार रवींद्र हरपे (२७५४ मते), भूषण लाडवंजारी (९७४ मते), **इतर मागासवर्ग-** झालेले मतदान-१०६०४, वैध मते- ९६५१, अवैध मते- ९५३, विजयासाठी कोटा- ४८२६, विजयी उमेदवार अमोल पाटील (६३६७ मते), पराभूत उमेदवार योगेश भावसार (२४४५ मते), विलास बडगुजर (८३९ मते) **महिला संवर्ग-** झालेले मतदान- १०६०४, वैध मते-९६०८, अवैध मते- ९९६, विजयासाठी कोटा- ४८०५ विजयी उमेदवार मनिषा चौधरी (६२७१ मते), पराभूत उमेदवार वंदना पाटील (२८९८ मते), मंजुळा मुंदडे (४३९ मते), **खुला संवर्ग- (जागा पाच)** झालेले मतदान-१०६०४, वैध मते-९१४५, अवैध मते- १४५९, विजयासाठी कोटा- १५२५ विजयी उमेदवार विष्णू भंगाळे (पहिल्या फेरीत १६९४ मते प्राप्त करुन विजयी), अमोल मराठे (नवव्या फेरी अखेर १५४३ मते प्राप्त करुन विजयी), दीपक पाटील (तेराव्या फेरी अखेर १७०० मते प्राप्त करुन विजयी), अमोल सोनवणे (पंधराव्या फेरी अखेर १६४० मते प्राप्त करुन विजयी) आणि दिनेश नाईक (सोळाव्या फेरी अखेर निर्धारित कोटा पूर्ण केला नसला तरी इतर उमेदवारांपेक्षा जास्त मते असल्यामुळे विजयी घोषित. प्राप्त मते ११४३).

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
A' Grade
'(NAAC Re-Accredited )
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६



**पराभूत उमेदवार**- यशवंत येवलेकर (११०० मते), प्रवीण नेरपगार (७५२ मते), निखिलकुमार वायकोळे (५८५ मते), कुणाल पवार (५०२ मते), प्रितेश ठाकूर (३४१ मते), सत्यजित पाटील (२६३ मते), प्रकाश पाटील ( १७८ मते), विलास बडगुजर (१७४ मते), अतुल कदमबांडे (१११ मते), जमील देशपांडे (१०३ मते), अश्फाक पिंजारी (४३ मते), संजय भोकरडोळे (२९ मते), उमाकांत वाणी (२३ मते)

खुल्या संवर्गातील पाच जागांच्या मतांची मोजणी पंधराव्या फेरीपर्यंत चालली. विजयी उमेदवाराने निर्धारित कोटापेक्षा जास्त मते प्राप्त केल्यानंतर ती जास्त मते हस्तांतरीत झाली. तसेच कमी मते प्राप्त झालेले उमेदवार वगळण्यात आले. या सर्व प्रक्रियेमुळे मतमोजणी गुरुवारी दुपारपर्यंत चालली. विद्यापीठातील १०० पेक्षा अधिक अधिकारी-कर्मचारी या २८ तासांच्या मतमोजणी प्रक्रियेत रात्रं-दिवस काम करीत होते. निवडणूक निर्णय अधिकारी भ.भा.पाटील यांच्या हस्ते विजयी उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात आले. ही संपूर्ण मतमोजणीची प्रक्रिया अत्यंत शांततेत झाली. एकूण सहा संवर्गासाठी ६३ हजार ६२४ मतदान झाले. त्यापैकी ६ हजार ५८५ मते अवैध ठरली.

२५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी विद्यापीठाच्या पदवीधरांच्या अधिसभेची मतमोजणी पार पडली हे विशेष. त्यानिमित्त कुलसचिव भ.भा.पाटील तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी मतमोजणीच्या ठिकाणी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २५ जानेवारी, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**
कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी